पोलीस अधीक्षक रत्नागिरी यांचेकार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, रत्नागिरी ४१५६१२,
दुरध्वनी क्र.०२३५२-२७१२५७, फॅक्स क्र. ०२३५२-२७१२५८, E-mail ID – sp.ratnagiri@mahapolice.gov.in

पोलीस भरती-२०२४-२०२५/पोलीस शिपाई लेखी परीक्षा/ ३८९४ /२०२६, रत्नागिरी दि.१४/०३/२०२६

## रत्नागिरी जिल्हा पोलीस दल
## पोलीस शिपाई भरती सन २०२४-२०२५
## पोलीस शिपाई - लेखी परीक्षा

रत्नागिरी जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील सन २०२४-२०२५ मध्ये रिक्त असलेल्या १०० पोलीस शिपाई पदांकरीता शारीरिक व मैदानी चाचणी फेब्रुवारी-२०२६ महिन्यामध्ये पार पडली आहे. मैदानी चाचणीत किमान ५० टक्के व त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त करणारे उमेदवारांची १:१० या प्रमाणात लेखी परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची नावाची यादी या कार्यालयाकडील जा.क्र.आस्था-१/पोलीस शिपाई १:१० लेखी परीक्षा यादी/३२२०/२०२६ दि.०५/०३/२०२६ अन्वये रत्नागिरी जिल्हा पोलीस दलाचे https://ratnagiripolice.gov.in संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानुसार लेखी परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची **लेखी परीक्षा दि.१५/०३/२०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे**. तरी उमेदवारांनी परीक्षेकरीता येताना खालील सुचनांचे तंतोतंत पालन होईल याची दक्षता घ्यावी.

**<u>उमेदवारांसाठी सुचना</u> :-**

१) **उमेदवारांना मैदानी चाचणीच्यावेळी देण्यात आलेले प्रवेशपत्र व लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र असे दोन्ही प्रवेशपत्र सोबत आणणे आवश्यक आहे. तरच परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाईल. तसेच स्वतःचे पासपोर्ट साईज आकाराचे प्रवेशपत्रामध्ये नमुद केलेले फोटोची दोन प्रत सोबत आणावी.**
२) प्रवेशपत्र आणि पासपोर्ट साईज फोटो व्यतिरिक्त इतर कोणतीही वस्तु/साहित्य सोबत घेवुन येवु नये. अन्यथा लेखी परीक्षेसाठी प्रवेश दिला जाणार नाही.
३) लेखी परीक्षा ९० मिनिटांची व १०० गुणांसाठी आहे. परीक्षा मराठी भाषेत घेण्यात येईल.
४) **उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरु होण्यापुर्वी किमान २ तास अगोदर हजर रहावे.**
५) परीक्षा केंद्रावर उमेदवारास बॉल पॉईन्ट पेन व लेखनासाठी पॅड पुरविण्यात येतील.
६) उमेदवारांनी परीक्षा केंद्रात भ्रमणध्वनी/डिजीटल डायरी / मायक्रोफोन/ मायक्रो कॅमेरा / मायक्रो कॅमेरा डिव्हाईस / कॅल्क्युलेटर/ डिजीटल नोट पॅड / नोट्स पुस्तके/ ईअरफोन/ हिअरिंग डिव्हाईस / स्मार्ट वॉचेस/ स्मार्ट आय ग्लासेस तसेच इलेक्ट्रॉनिक व रेडिओ फ्रिक्वेन्सी किंवा इतर कोणत्याही तंत्रज्ञानाचा वापर करण्यास व आणण्यास सक्त मनाई आहे. अशा प्रकारचे साहित्य उमेदवाराने बाळगल्यास तसेच परीक्षा केंद्रात कॉपी करताना आढळुन आल्यास उमेदवारास त्याच क्षणी भरती प्रकियेतुन बाद ठरवुन त्याची उमेदवारी रद्द करुन त्याचेविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
७) परीक्षा केंद्रात एकदा प्रवेश दिल्यानंतर परीक्षा संपेपर्यत बाहेर जाण्यास सक्त मनाई राहील.
८) उत्तरपत्रिका ही कार्बनलेस (ओ.एम.आर शीट) या प्रकारातील असुन दोन प्रतित असेल. परीक्षा कालावधी संपेपर्यत उत्तरपत्रिकेचा भाग-२ मुळ उत्तर पत्रिकेपासुन कोणत्याही परिस्थितीत वेगळा करु नये.
९) एकापेक्षा अधिक वर्तुळे गोलांकित केल्यास अशा उत्तरास गुण दिले जाणार नाहीत.
१०) अंतिम निकाल लागल्यानंतर उमेदवारांना लेखी परीक्षेस प्राप्त गुणांसंदर्भात काही शंका/ तक्रार असल्यास त्या संदर्भात निकालानंतर २४ तासाच्या आत उमेदवारांनी भरती अध्यक्ष नावाने रु.२००/- शुल्कासह हजर राहुन लेखी निवेदन सादर करावे. २४ तासानंतर येणा-या उमेदवारांच्या निवेदनाचा विचार करण्यात येणार नाही.
११) **उमेदवारांना लेखी परीक्षेमध्ये किमान ४० टक्के गुण मिळवणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षेमध्ये ४० टक्के पेक्षा कमी गुण असलेले उमेदवार अपात्र समजण्यात येतील.**

**( नितीन दत्तात्रय बगाटे )**
पोलीस अधीक्षक, रत्नागिरी.

Scanned with OKEN Scanner